

गलूर : सेट परीक्षेमध्ये यश मिळवल्याबद्दल देगलूर महाविद्यालयात चैताली पातावार हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# देगलूर महाविद्यालयात चेताली पातावारचा सत्कार

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाची विद्यार्थिनी चैताली रामराव पातावार ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यावतीने आयोजित केलेल्या सेट परीक्षेमध्ये लोकप्रशासन विषयात यशस्वी झाली आहे. त्याबदल महाविद्यालयात उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार, डॉ. संजय देबडे, डॉ. अशोक टिपरसे, डॉ. माधव चोले, पालक रामराव पातावार उपस्थित होते. चैताली पातावर ही पूर्णत: दिव्यांग असून प्रचंड जिद्द, नियमित अभ्यास व आत्मविश्वासाच्या बळावर तिने हे यश संपादन केले आहे. त्यामुळे तिचे अनेकांनी अभिनंदन केले असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

Scanned with OKEN Scanner